# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## कर सहायक, गट-क परीक्षा-२०१४

## - अंतिम निकाल —

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 22 फेब्रुवारी, 2015 रोजी घेण्यात आलेल्या कर सहायक, गट-क परीक्षा 2014 च्या एकूण 700 पदांपैकी 588 पदांचा अंतिम निकाल, उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहून **दि. 7 नोव्हेंबर, 2015 रोजी** जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेमधून मालेगांव, नाशिक येथील श्री. कुवर रोहन रघुनाथ (NS004396) हे राज्यात प्रथम व मागासवर्गीयांमधूनही प्रथम आले आहेत. तसेच महिलांमध्ये मिरज, सांगली येथील श्रीमती राजमाने पूजा अशोक (SN002169) ह्या प्रथम आल्या आहेत.

2. गुणवत्ताधारक खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकरिता शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस त्यांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी तपासण्याच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे.

3. कर सहायक या पदासाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारस याद्या आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

4. विशेष मागास प्रवर्ग —अ (SBC-A) प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भातील दि. 24 जुलै, 2014 रोजीचा शासन निर्णय दि. 2 मार्च, 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द झाल्याने प्रस्तुत प्रकरणी उक्त प्रवर्गाची आरक्षित 35 पदे समांतर आरक्षणासहित अमागास प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत.

5. शासनाच्या दि. 21 फेब्रुवारी, 2015 रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दि.14 नोव्हेंबर, 2014 पूर्वी शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह पद भरतीची जाहिरात दिली असल्यास अशी पदे मा. उच्च न्यायालयाचे अंतिम निर्णय होईपर्यंत भरण्यात येवू नयेत, अशी पदे भरण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल, मात्र शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग वगळता उर्वरित पदे जाहिरातीनुसार भरण्याची कार्यवाही करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तुत परीक्षेतील ESBC वर्गवारीसाठी आरक्षित असलेल्या 112 पदांचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे.

6. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत आयोगाकडे online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

ठिकाण : मुंबई

दिनांक : 7 नोव्हेंबर, 2015.

**विजया पडते**
**उप सचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**